महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद)
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३०.

दूरध्वनी : २४४७६९३८,२४४७५५७१,२४४७८३
फॅक्स : ०२०-२४४७७०९०, २४४८१२६९
ई-मेल : dir.mscert@gmail.com
Website : www.mscert.org.in

जा.क्र.मराशैसंप्रप/डी.टी.एड./प्रवेश कक्ष/२०१२-१३/2069
दिनांक - 12 /०७/२०१२

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
श्रीकृष्ण अवधूत डी. एड. कॉलेज,
पी.सी. क्र. १८, प्लॉट क्र. १६४/३b,
कोकणा (नवेगांव) बांध,
ता. सडक /अर्जुनी, जि. गोंदिया

विषय :- सन २०११-२०१२ या वर्षात राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेकडून मान्यता प्राप्त नवीन अध्यापक विद्यालय / अतिरिक्त तुकडीस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यतेबाबत.

संदर्भ :- १) एन. सी. टी. ई. भोपाळ यांचे पत्र क्र WRC/5-6/150th/APWO7055/1222090/2011/81561 दिनांक २०/०९/२०११

२) महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग यांचे आदेश क्रमांक टिसीएम- २०११/(२२७/११)/ माशि-४ दिनांक ०७/०३/२०१२.

एन.सी.टी.ई. भोपाळ यांचेकडून उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपल्या संस्थेस नवीन अध्यापक विद्यालय सुरु करण्यासाठी काही अटी आणि शर्तींच्या अधीन राहून सन २०११-२०१२ पासून नवीन अध्यापक विद्यालयास परवानगी देण्यात आलेली आहे. खालील अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन अध्यापक विद्यालयाच्या व्यवस्थापनाने करावे. त्याचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) एन. सी.टी.ई. भोपाळ यांनी विहित केलेल्या निकषांचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घेण्यात यावी.

२) विहित अर्हताधारक व अनुभवी प्राचार्य व अध्यापक यांची एन.सी.टी.ई. भोपाळ च्या व महाराष्ट्र शासनाच्या निकषानुसार तसेच महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती ) मधील तरतुदीस अधीन राहून नेमणूक करावी. वय वर्ष ५८ पेक्षा जास्त वयाचे प्राचार्य किंवा अध्यापकांची नेमणूक करता येणार नाही.

३) नेमलेल्या सर्व शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विभागीय शिक्षण उपसंचालक यांची मान्यता घेण्यात यावी.

४) प्रवेशाच्या वेळी प्रचलित शासन धोरणानुसार व महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रवेश करण्यात येतील.

५) जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेशी सातत्याने संपर्क ठेवून आवश्यक ते मार्गदर्शन घेतले जावे व त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

६) भविष्यात शुल्क वाढीसाठी अध्यापक विद्यालय शुल्क विनियमन प्राधिकरण, पुणे (द्वारा-महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे- ३० यांचे कडे प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक, यांचे मार्फत सादर करावा. सध्या रु.१२,०००/- वार्षिक फी आकारावी.

७) दर वर्षी एन.सी.टी.ई. ला स्टाफ प्रोफाईल विहित नमुन्यात परिषदेच्या संचालकांच्या प्रतिस्वाक्षरीसह सादर करण्यात यावेत.

८) महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रम, मूल्यमापन पध्दती, प्रात्यक्षिक कार्य इ. बाबींचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असेल.

E/pravesh kaksh-2



प्राचार्य
श्रीकृष्ण अवधूत डी. एड. कॉलेज
कोकणा,ता सडक अर्जुनी जि. गोंदिया

९) आपल्या अध्यापक विद्यालयात केंद्रीय प्रवेश विभागस्तर व राज्यस्तरावरुन करण्यासाठी प्रवेश प्रक्रिया शुल्क प्रति तुकडी प्रमाणे शासनाच्या क्र. टीसीएम २०११/(२२७/११) माशि-४ दिनांक ०७ मार्च २०१२ अन्वये रुपये २,००,०००/- (रुपये दोन लक्ष) शुल्काचा डी.डी. अध्यक्ष राज्यस्तरीय डी .टी. एड प्रवेश, निवड, निर्णय व प्रवेश संनियंत्रण समिती,पुणे यांचे नावे परिषदेत जमा करावा.

१०)अध्यापक विद्यालय चालविताना ते सुरळीत चालावे म्हणून संबंधित जिल्हयाचे प्राचार्य डाएट, विभागीय शिक्षण उपसंचालक, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांचे वेळोवेळी मार्गदर्शन घेऊन कार्यवाही करावी.

११) सदर अध्यापक विद्यालयास महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची संलग्नता घेणे बंधनकारक राहिल. सोबत दिलेल्या नमुन्यात रुपये १००/- च्या स्टॅम्पवर लेखी हमीपत्र विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडे सादर करावे.

१२) एन.सी.टी.ई.च्या निकषाप्रमाणे तसेच विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्याकडील तपासणी अहवालातील त्रुटींच्या /अटींच्या पूर्ततेच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे. अध्यापक विद्यालय सुरु झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत त्रुटी/अटींची पूर्तता करावी.

वरील सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करावे.

अध्यापक विद्यालयाचा तपशील

| एन.सी.टी.ई कोड नं. / दिनांक | अध्यापक विद्यालयाचे नाव व ठिकाण (पत्ता) | माध्यम | प्रकार | प्रवेश क्षमता | मान्यतेचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| APWO 7055/ 1222090 20/09/2011 | श्रीकृष्ण अवधूत डी. एड. कॉलेज, पी.सी. क्र. १८, प्लॉट क्र. १६४/३b, कोऱ्हणा (नवेगांव) बांध, ता. सडक /अर्जुनी, जि. गोंदिया | मराठी | मिश्र | शासकीय कोटा - ४० व्यवस्थापन कोटा - १० | २०११-२०१२ (प्रत्यक्ष प्रवेश सन २०१२-१३ करणे ) |

(एन. के. जरग)
संचालक
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, पुणे-३०

प्रत,

१) मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय. विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर
२) विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर.
३) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, गोंदिया यांना पुढील कार्यवाहीसाठी.
४) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, १७, डॉ आंबेडकर मार्ग, पुणे-१
५) डी.टी.एड. प्रवेश कक्ष (अध्यापक विद्यालयांच्या सुधारित यादीसाठी)

E/pravesh kaksh-2

प्राचार्य
श्रीकृष्ण अवधुत डी. एड. कॉलेज
कोऱ्हणा ता सडक अर्जुनी जि गोंदिया